PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Jawai Maza Bhala
Year: 1960

Song: Kay Magu Me Konapashi
Lyricist: G. D. Madgulkar

काय मागू मी कोणापाशी
काय मागू मी कोणापाशी
अंगणी गंगा घरात काशी
अंगणी गंगा घरात काशी
अंगणी गंगा घरात काशी

देवाहूनही उदार सुंदर
सुवासिनीचा श्रीविश्वेश्वर
देवाहूनही उदार सुंदर
सुवासिनीचा श्रीविश्वेश्वर
जवळी माझ्या वसे दिन निशी
जवळी माझ्या वसे दिन निशी
अंगणी गंगा घरात काशी
अंगणी गंगा घरात काशी

तपावाचूनी कृपा लाभली
हिरवळ पायी शिरी सावली
तपावाचूनी कृपा लाभली
हिरवळ पायी शिरी सावली
सौख्य सजविते तना मनाशी
सौख्य सजविते तना मनाशी
अंगणी गंगा घरात काशी
अंगणी गंगा घरात काशी

स्वप्नाहूनही सत्य मनोहर
अमृत सांडे तृप्त मनावर
तृप्त मनावर
स्वप्नाहूनही सत्य मनोहर
अमृत सांडे तृप्त मनावर
तृप्त मनावर
प्रमोद कवळी दाही दिशांशी
प्रमोद कवळी दाही दिशांशी
अंगणी गंगा घरात काशी
काय मागू मी कोणापाशी
अंगणी गंगा घरात काशी
अंगणी गंगा घरात काशी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*